Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**A**

# Paper-III
# POLITICAL SCIENCE

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

   (Name) ................................................

2. (Signature) ........................................

   (Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## JAN - 15318

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **48** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# POLITICAL SCIENCE

## Paper III

# राज्यशास्त्र

## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. According to the UNDP's Human Development Report of 1994, which one of the following is *incorrectly* stated as an issue falls within the scope of human security.
   - (A) Economic security, Food security
   - (B) Health security, Environmental security
   - (C) Personal security, Community security
   - (D) Political security, Energy security

1. संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमाच्या मानवी विकासावरील 1994 च्या अहवालानुसार मानवी सुरक्षेच्या व्याहनीत समाविष्ट होऊ शकणार नाही असा चुकीचा पर्याय कोणता ?
   - (A) आर्थिक सुरक्षा, अन्न सुरक्षा
   - (B) आरोग्य सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा
   - (C) व्यक्तिगत सुरक्षा, समूहाची सुरक्षा
   - (D) राजकीय सुरक्षा, उर्जा सुरक्षा

2. What is the ultimate goal of state according to the offensive realism propounded by Mearsheimer ?

(A) Power

(B) Hegemony

(C) Authority

(D) Peace

3. Who was/is the UN Secretary General took the initiative to conflict prevention and move the UN from a culture of reactions to a culture of prevention ?

(A) Ban Ki Moon

(B) Butros Butros Ghali

(C) Kofi Annan

(D) Kurt Waldheim

2. मिअरशायमर या विचारवंताने मांडलेल्या आक्रमक वास्तववादानुसार राज्याचे अंतिम उद्दिष्ट कोणते ?

(A) सत्ता

(B) प्रभुत्व

(C) अधिकार

(D) शांतता

3. खालीलपैकी संयुक्त राष्ट्रांच्या कोणत्या महासचिवाने संघर्ष निराकरणात पुढाकार घेऊन संयुक्तराष्ट्रांना प्रतिकारात्मक संस्कृतीपासून प्रतिबंधात्मक संस्कृतीकडे नेले ?

(A) बान की मून

(B) ब्युट्रांस ब्युट्रांस घाली

(C) कोफी अन्नान

(D) कुर्ट वाल्डहाईम

4. You have been asked to design a comprehensive program to combat corruption in bureaucracy. Which of the following measures would you adopt ?

(*a*) Reform of Indian Penal Code

(*b*) Modification of the Prevention of Corruption Act.

(*c*) Improvement in inter-ministerial coordination

(*d*) Reduction in protection given by Art. 311 of the Constitution

*Codes* :

(A) (*a*) and (*d*)

(B) (*b*) and (*c*)

(C) (*c*) and (*d*)

(D) (*a*), (*b*) and (*d*)

4. नौकरशाहीतील भ्रष्टाचार संपवण्यासाठी एक सर्वसमावेशक कार्यक्रम आखण्यास आपल्याला सांगण्यात आले आहे. त्यासाठी खालीलपैकी कोणत्या उपाययोजना तुम्ही स्वीकाराल ?

(*a*) भारतीय दंड विधानात सुधारणा

(*b*) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यात बदल

(*c*) शासनाच्या खात्यांमधील समन्वयात सुधारणा

(*d*) राज्यघटनेच्या कलम 311 ने दिलेल्या संरक्षणात कपात

**संकेतांक** :

(A) (*a*) आणि (*d*)

(B) (*b*) आणि (*c*)

(C) (*c*) आणि (*d*)

(D) (*a*), (*b*) आणि (*d*)

5. Given below are two statements, one labelled as Assertion (A) and the other labelled as Reason (R) :

**Assertion (A) :** The Prime Minister's Office maintains liaison with the President and Governors.

**Reason (R) :** The Prime Minister's Office acts as the think tank of the Prime Minister.

In the context of the above which one of the following is *correct* ?

**Codes :**

(A) (A) is true but (R) is false.

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(D) Both (A) and (R) are false

5. खाली दोन विधाने दिले आहेत. एक विधान (A) तर दुसरे कारण (R) :

**विधान (A) :** पंतप्रधान कार्यालय राष्ट्रपती व राज्यपाल यांच्याशी संपर्क राखण्याचे काम करते.

**कारण (R) :** पंतप्रधानांचे कार्यालय पंतप्रधानांच्या वतीने विचार करणारे कार्यालय म्हणून कार्य करते.

वरील दोन विधानांच्या संदर्भात खाली दिलेल्या सूचीतील योग्य उत्तर शोधा.

**संकेतांक :**

(A) (A) बरोबर आहे परंतु (R) चूक आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहे पण (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

(C) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहे आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(D) (A) आणि (R) दोन्ही चूक आहेत

6. What are the sources of Development Administration ?
   (A) Globalization, consumerism, international trade
   (B) Fundamental Rights, fundamental duties, secularism
   (C) Economic development, Political awarness, democracy
   (D) Directive principles, socio-economic justice, welfarism

7. Match List I with List II and select the *correct* answer from the codes given below :

**List I**

(*a*) Political Affairs Committee
(*b*) Estimates Committee
(*c*) National Development Council
(*d*) Inter-state Council

**List II**

(1) Administrative reforms
(2) Decisions regarding security
(3) Cooperative federalism
(4) Representation to Chief Ministers

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (2) | (1) |
| (B) | (3) | (1) | (4) | (2) |
| (C) | (2) | (3) | (1) | (4) |
| (D) | (2) | (1) | (4) | (3) |

6. विकासाच्या प्रशासनाचे स्रोत कोणते ?
   (A) जागतिकीकरण, चंगळवाद, आंतरराष्ट्रीय व्यापार
   (B) मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये, धर्म-निरपेक्षता
   (C) आर्थिक विकास, राजकीय जागरूकता, लोकशाही
   (D) मार्गदर्शक तत्त्वे, सामाजिक-आर्थिक न्याय, लोककल्याणकारी दृष्टिकोन

7. खाली दिलेल्या संकेत सूचीचा वापर करून यादी I आणि यादी II च्या योग्य जोड्या जुळवा :

**यादी I**

(*a*) राजकीय व्यवहार समिती
(*b*) अंदाज समिती
(*c*) राष्ट्रीय विकास परिषद
(*d*) आंतर-राज्य मंडळ

**यादी II**

(1) प्रशासकीय सुधारणा
(2) सुरक्षितता संदर्भात निर्णय
(3) परस्परसाहाय्यकारी राष्ट्रे
(4) मुख्यमंत्रीला प्रतिनिधित्व

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (3) | (2) | (1) |
| (B) | (3) | (1) | (4) | (2) |
| (C) | (2) | (3) | (1) | (4) |
| (D) | (2) | (1) | (4) | (3) |

8. Which two of the following statements are linked with administrative leadership ?

(*a*) Influencing people to strive willingly for mutual objectives.

(*b*) Mobilizing people to widen social base.

(*c*) Encouraging people for participation

(*d*) Rewarding people for organizational efficiency.

**Codes :**

(A) (*a*) (*c*) and (*d*)

(B) (*b*) and (*d*)

(C) (*a*), (*b*) and (*d*)

(D) (*b*), (*c*) and (*d*)

8. खालीलपैकी कोणती दोन विधाने प्रशासकीय नेतृत्वाशी जोडलेली आहेत ?

(*a*) समान उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी स्वेच्छेने प्रयत्न करण्यासाठी लोकांना प्रभावित करणे.

(*b*) सामाजिक आधार वाढवण्यासाठी लोकांना उद्युक्त करणे.

(*c*) सहभागासाठी लोकांना प्रोत्साहन देणे.

(*d*) संघटनात्मक कार्यक्षमतेसाठी लोकांना बक्षीस देणे.

**संकेतांक :**

(A) (*a*) (*c*) आणि (*d*)

(B) (*b*) आणि (*d*)

(C) (*a*), (*b*) आणि (*d*)

(D) (*b*), (*c*) आणि (*d*)

9. What is corporate governance ?

(*a*) It is a government by public corporations.

(*b*) It is a governance protecting the interests of the stakeholders.

(*c*) It is a governance protecting ethical and moral values.

(*d*) International governance.

**Codes :**

(A) (*a*) and (*d*)

(B) (*b*) and (*c*)

(C) (*c*) and (*d*)

(D) (*a*) and (*b*)

10. Who of the following advocated the dependency theory of development administration ?

(A) Gunder Frank

(B) Frank Marini

(C) Chester Barnard

(D) MacGregor

9. लोकनिगमात्मक पद्धतीने शासनव्यवहार (Corporate governance) करणे म्हणजे काय ?

(*a*) लोक निगमांच्या मार्फत शासन करणे.

(*b*) लाभार्थ्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करणारे शासनव्यवहार.

(*c*) प्रामाणिकपणा आणि नैतिक मूल्यांचा अंगीकार करणारे शासनव्यवहार.

(*d*) आंतरराष्ट्रीय शासनव्यवहार.

**संकेतांक :**

(A) (*a*) आणि (*d*)

(B) (*b*) आणि (*c*)

(C) (*c*) आणि (*d*)

(D) (*a*) आणि (*b*)

10. विकासाच्या प्रशासनाच्या संदर्भात परावलंबित्वाचा सिद्धान्त खालीलपैकी कोणी मांडला ?

(A) गुंडर फ्रँक

(B) फ्रँक मॅरिनी

(C) चेस्टर बर्नार्ड

(D) मॅकग्रेगर

11. Which of the following critera is considered while creating a Nagar Panchayat ?
    - (A) the degree of urbanization
    - (B) proportion of employment in non-agricultural activities
    - (C) the degree of people's participation
    - (D) infrastructure facilities

12. Choose the *incorrect* statement of the following :
    - (A) The scope of Judicial Review in Canada was expanded with Canadian Charter of rights and freedom in 1982
    - (B) In India Articles 131-136 of the Constitution have vested in the Supreme Court the powers of Judicial Review
    - (C) In US, Judicial Review was asserted for the first time in 1803 in Marbury *Vs.* Medison case
    - (D) In Switzerland Supreme Court is empowered to make Judicial Review of Federal Law

11. नगरपंचायत निर्माण करताना खालीलपैकी कोणत्या निकषाचा विचार केला जातो ?
    - (A) शहरीकरणाचे प्रमाण
    - (B) बिगरशेती व्यवसायातील रोजगाराचे प्रमाण
    - (C) लोकांच्या सहभागाचे प्रमाण
    - (D) अंतर्गत सुविधा

12. खालीलपैकी **चुकीचे** विधान ओळखा :
    - (A) कॅनडामधील न्यायालयीन पुनर्विलोकनाची व्याप्ती 1982 सालाच्या कॅनेडीयन चार्टर ऑफ राईटस् ॲन्ड फ्रिडम या माध्यमातून वाढविण्यात आली
    - (B) भारतात राज्यघटनेच्या कलम 131–136 द्वारे सर्वोच्च न्यायालयाचा न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क बहाल झाला आहे
    - (C) अमेरिकेन 1803 च्या मार्बरी विरुद्ध मेडीसन या खाटल्यामध्ये न्यायालयीन पुनर्विलोकनाचा हक्क पहिल्यांदा बजावण्यात आला
    - (D) स्वित्झर्लंडमध्ये संघीय कायद्याचे न्यायालयीन पुनर्विलोकन करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे

13. How the President of America is elected ?

(A) Directly by people

(B) Citizens elect the members of electoral college, these electors then cast direct votes for the President

(C) The US Congress elects the President of America

(D) The Senators elect the President of America

14. Choose the *incorrect* statement :

(A) Executive power in Switzerland is held by a committee consisting of 7 members

(B) Switzerland's constitution of 1848 provided for a Federal Council

(C) Each of the ministers in Federal Council has equal power and is elected by Parliament

(D) The Swiss Constitution expects that the executive decisions should be taken by the President

13. अमेरिकेच्या राष्ट्रांध्यक्षांची निवड कशी होते ?

(A) लोकांकडून प्रत्यक्षपणे

(B) नागरिकांकडून राष्ट्रांध्यक्षांच्या निर्वाचक गणातील सदस्यांची निवड होते. नंतर हे सदस्य राष्ट्रांध्याक्षासाठी प्रत्यक्ष मतदान करतात

(C) अमेरिकेच्या राष्ट्रांध्यक्षांची निवड अमेरिकन काँग्रेसकडून होते

(D) अमेरिकेच्या राष्ट्रांध्यक्षांची निवड सिनेट सदस्यांकडून होते

14. खालीलपैकी **अयोग्य** विधान ओळखा :

(A) स्वित्झर्लंडमध्ये कार्यकारी सत्ता ही सात सदस्यांच्या समितीकडे असते

(B) स्वित्झर्लंडच्या 1848 च्या राज्यघटनेने संघीय (सांघीक) मंडळाची तरतूद केली आहे

(C) संघीय मंडळातील प्रत्येक मंत्र्याकडे समान सत्ता असते आणि हे मंत्री संसदेकडून निवडले जातात

(D) स्वित्झर्लंडची राज्यघटना असे म्हणते की कार्यकारी निर्णय राष्ट्रांध्यक्षांकडून घेतले जावेत

15. Choose the *incorrect* sentence :

(A) Indian President can declare state emergency in a state through Article 356

(B) Article 356 gives wider powers to the central government to assert its authority over a state

(C) With Article 356 the powers of the legislature of the state shall be exercised by or under the authority of the Parliament

(D) In the Golaknath case the Supreme Court discussed at length the provisions regarding Article 356

15. खालीलपैकी कोणते विधान **चूक** आहे ?

(A) भारतीय राष्ट्रपती कलम 356 अन्वये घटकराज्यात आणिबाणी जाहिर करू शकतात

(B) कलम 356 द्वारे केंद्र सरकारला राज्यावर आपली अधिसत्ता प्रस्थापित करण्यासाठी व्यापक अधिकार प्राप्त होतात

(C) कलम 356 नुसार राज्याच्या कायदेमंडळाचे अधिकार संसदेकडून किंवा संसदेमार्फत वापरला जातो

(D) गोलकनाथ खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने 356व्या कलामासंबंधी विस्ताराने चर्चा केली आहे

16. In which state the upper house of the legislature, gets equal representation from federating units ?

(A) India

(B) USA

(C) UK

(D) None of the above

16. कोणत्या राज्यात कायदेमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात प्रत्येक राज्याला समान प्रतिनिधित्व मिळते ?

(A) भारत

(B) अमेरिका

(C) युनायटेड किंगडम

(D) वरीलपैकी कोणतेही नाही

17. Find the wrongly mentioned member of the Chicago-Michigan tradition of system theory in international relations :

(A) Harold Laski

(B) Anatoli Raport

(C) David Singer

(D) Morton Kaplan

18. Which of the following initiated the idea of arms control for the first time ?

(A) Hague Peace Conference (1899)

(B) Geneva Protocol of 1925

(C) 14 Points of Woodrow Wilson (1919)

(D) Four Powers Declaration of 1945

17. आंतरराष्ट्रीय राजकारणातील व्यवस्था सिद्धांताच्या शिकागो-मिशीगन परंपरेतील कोणता सदस्य चुकीचा आहे ते शोधा :

(A) हेरॉल्ड लास्की

(B) अॅनातोली रॅपोर्ट

(C) डेव्हीड सिंगर

(D) मॉर्टन काप्लान

18. खालीलपैकी कशाद्वारे शस्त्र नियंत्रण ही कल्पना प्रथम मांडली गेली ?

(A) हेग शांतता परिषद (1899)

(B) जिनेव्हा संधी (1925)

(C) वुड्रो विल्सन यांची 14 कलमे (1919)

(D) चार शक्तींचे घोषणापत्र (1945)

19. Given below are two statements, one labelled as Assertion (A) and the other labelled as Reason (R) :

**Assertion (A) :** The 17th NAM Summit in Venezuela was attended by India's Vice-President Hamid Ansari.

**Reason (R) :** In the post-cold war world NAM is expected to focus on core issues of global concern.

In the context of the above two statements, which of the following is *correct* ?

**Codes :**

(A) (A) is true, (R) is false

(B) (A) is false, (R) is true

(C) Both (A) and (R) are individually true, and (R) is the correct explanation of (A)

(D) Both (A) and (R) are individually true, but (R) is not the correct explanation of (A)

19. खाली दोन विधाने दिले आहेत. एक विधान (A) आणि दुसरे कारण (R) :

**विधान (A) :** व्हेनेझुएला येथील 17व्या अलिप्तराष्ट्र शिखर संमेलनात भारताचे उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांनी भाग घेतला.

**कारण (R) :** शीतयुद्धोत्तर काळात अलिप्तराष्ट्र संघटनेद्वारे मूलभूत जागतिक समस्यांवर लक्ष केंद्रित करावे, अशी अपेक्षा आहे.

ह्या दोन विधानांच्या संदर्भात खालीलपैकी कोणता पर्याय **बरोबर** आहे ?

**संकेतांक :**

(A) (A) बरोबर आहे पण (R) चूक आहे

(B) (A) चूक आहे, पण (R) बरोबर आहे

(C) दोन्ही (A) आणि (R) स्वतंत्रपणे बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(D) दोन्ही (A) आणि (R) स्वतंत्रपणे बरोबर आहेत, परन्तु (R) हे (A) चे योग्य स्पष्टीकरण नाही

20. India's claim for permanent seat in the UN Security Council is justified for the following reasons :

(*i*) India has successfully conducted nuclear explosions.

(*ii*) India has never attacked any country.

(*iii*) Indian economy is growing fast.

(*iv*) India has achieved greater diplomatic clout among third world countries.

Choose the *correct* answer from the following codes :

(A) All are correct

(B) (*i*), (*ii*) and (*iii*) are correct

(C) (*iii*) and (*iv*) are correct

(D) (*i*), (*iii*) and (*iv*) are correct

20. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यत्वावरील भारताचा दावा खालील मुद्द्यांनुसार समर्थनीय आहे :

(*i*) भारताने यशस्वी अणुचाचण्या केल्या आहेत.

(*ii*) भारताने कधीच कोणत्या देशावर आक्रमण केले नाही.

(*iii*) भारतीय अर्थव्यवस्थेची झपाट्याने वाढ होत आहे.

(*iv*) तिसऱ्या जगातील देशांमध्ये भारताने जास्त राजनैतिक वजन प्राप्त केले आहे.

खालील पर्यायांमधून **योग्य** उत्तर निवडा :

(A) सर्व पर्याय बरोबर आहेत

(B) (*i*), (*ii*) आणि (*iii*) बरोबर आहेत

(C) (*iii*) आणि (*iv*) बरोबर आहेत

(D) (*i*), (*iii*) आणि (*iv*) बरोबर आहेत

21. Which attribute of 'Power' is *incorrectly* stated ?

(A) Capacity to influence

(B) Embodiment of reason

(C) Based on force

(D) Not backed by law

22. Who among the following has defined political development as "increased differentiation and specialization of political structure and increased secularisation of political culture".

(A) Samuel P. Huntington

(B) David Easton

(C) Gabriel A. Almond and G.B. Powell

(D) Alfred Diamont

21. सत्तेच्या वैशिष्ट्यांबाबत कोणती जोडी **अयोग्यपणे** जुळवली आहे ?

(A) प्रभाव पाडण्याची क्षमता

(B) विवेकशीलता

(C) बळाचा आधार

(D) कायद्याच्या पाठिंब्याचा अभाव

22. ''राजकीय संरचनांचे उत्तरोत्तर विभिन्नीकरण आणि विशेषीकरण होणे आणि राजकीय संस्कृतीचे ऐहिकीकरण होणे म्हणजे राजकीय विकास'' अशी राजकीय विकासाची व्याख्या खालीलपैकी कोणत्या विचारवंताने केली आहे ?

(A) सॅम्युअल पी. हंटिंग्टन

(B) डेव्हिड ईस्टन

(C) ग्रॅब्रिएल आलमंड आणि जी.बी. पॉवेल

(D) अल्फ्रेड डायमाँट

23. Examine the following statements about India's Nuclear Policy and mark the *incorrect* one :

    (A) India considers Nuclear Non-Proliferation Treaty (NPT) as discriminatory treaty

    (B) India is in favour of both vertical and horizontal nuclear weapon proliferation

    (C) India is for total nuclear disarmament

    (D) India is against declaring South Asia as a Nuclear Weapon Free Zone

23. भारताच्या आण्विक धोरणांविषयीच्या खालील विधानांचे परीक्षण करा आणि चुकीचे विधान सांगा :

    (A) भारताला अण्वस्त्र प्रसारबंदी कायदा अन्यायकारक वाटतो

    (B) भारत अण्वस्त्रांचा उभा आणि आडवा प्रसार करण्याच्या बाजूने आहे

    (C) संपूर्ण आण्विक नि:शस्त्रीकरणाला भारताचा पाठिंबा आहे

    (D) दक्षिण आशिया अण्वस्त्रमुक्त प्रदेश म्हणून घोषित करण्यात भारताचा विरोध आहे

24. Select from the following statements the main theme of the 1971 UN Declaration on Indian Ocean as a Zone of Peace. Use the codes :

(*i*) To eliminate the regional and extra regional power presence

(*ii*) To eliminate the great power presence in the context of great power rivalry

(*iii*) To make the region a Zone of Peace

(*iv*) To declare the region as a Nuclear Weapon Free Zone.

**Codes :**

(A) (*i*), (*ii*), (*iii*), (*iv*)

(B) (*ii*), (*iii*) only

(C) (*iii*), (*iv*) only

(D) (*i*), (*ii*) and (*iii*) only

24. 1971 च्या हिंदी महासागर हे शांतता क्षेत्र म्हणून घोषित करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यातील महत्त्वाचा विषय खालील विधानांमधून संकेतसूचीच्या आधारे शोधा :

(*i*) प्रादेशिक आणि प्रदेशबाह्य सत्तांचे अस्तित्व नष्ट करणे

(*ii*) बड्या सत्तांच्या संघर्षांच्या संदर्भात एखाद्या बड्या सत्तेचे अस्तित्व नष्ट करणे

(*iii*) संबंधित क्षेत्र शांतता क्षेत्र करणे.

(*iv*) संबंधित क्षेत्र अण्वस्त्रमुक्त क्षेत्र म्हणून घोषित करणे

**संकेतांक :**

(A) (*i*), (*ii*), (*iii*), (*iv*)

(B) फक्त (*ii*), (*iii*)

(C) फक्त (*iii*), (*iv*)

(D) फक्त (*i*), (*ii*) आणि (*iii*)

25. Choose the *correct* statement about 'security dilemma' from the following. Use codes :

(*i*) An important paradox inherent in the state system.

(*ii*) The existence of states is to provide security of its citizens by maintaining armed forces.

(*iii*) The existence of armed forces threatens the very security, they are expected to maintain.

(*iv*) There is no escape from the international security dilemma because there is no possibility forming a world government.

**Codes :**

(A) (*i*), (*ii*), (*iii*) are correct and (*iv*) is incorrect

(B) (*i*), (*ii*), (*iii*) and (*iv*) are correct

(C) (*i*), (*ii*) are correct and (*iii*), (*iv*) are incorrect

(D) (*i*), (*ii*), (*iv*) are correct and (*iii*) is incorrect

25. 'सुरक्षेचा पेच' या संदर्भातील खालील विधानांमधून **योग्य** विधानाची निवड करा :

(*i*) राज्यव्यवस्थेतील अंगभूत महत्त्वाचा विरोधाभास.

(*ii*) लष्करी दलांच्या आधारे नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी राज्यांचे अस्तित्व.

(*iii*) जी सुरक्षितता लष्करी दलांनी राखावयाची आहे तिलाच आपल्या अस्तित्वाने लष्करी दलांकडून धोका निर्माण केला जातो.

(*iv*) आंतरराष्ट्रीय सुरक्षा पेचापासून सुटका मिळवणे शक्य नाही कारण जगाचे एक शासन निर्माण घेण्याची शक्यता नाही.

**संकेतांक :**

(A) (*i*), (*ii*), (*iii*) बरोबर आहेत, (*iv*) चूक आहे

(B) (*i*), (*ii*), (*iii*) आणि (*iv*) बरोबर आहेत

(C) (*i*), (*ii*) बरोबर आहेत पण (*iii*), (*iv*) चूक आहेत

(D) (*i*), (*ii*), (*iv*) बरोबर आहेत तर (*iii*) चूक आहे

26. Compare List I (Theory) and List II (Scholars) and select the *correct* codes :

**List I (Theory)**

(*a*) Liberalism

(*b*) Realism

(*c*) Critical

(*d*) Dependency

**List II (Scholars)**

(1) Immanuel Kant

(2) Kautilya

(3) Immanuel Wallenstein

(4) Jurgen Habermass

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (4) | (3) | (2) |
| (B) | (4) | (3) | (2) | (1) |
| (C) | (1) | (2) | (4) | (3) |
| (D) | (1) | (2) | (3) | (4) |

26. यादी I मधील सिद्धान्तांची यादी II मधील विचारवंतांबरोबर योग्य जोड्या संकेतांकाच्या साहाय्याने जुळवा :

**यादी I**

(*a*) उदारमतवाद

(*b*) वास्तववाद

(*c*) चिकित्सा

(*d*) परावलंबी

**यादी II**

(1) इमॅन्युअल कांट

(2) कौटिल्य

(3) इमॅन्युअल वॉलेन्स्टीन

(4) जर्गन हाबरमास

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (1) | (4) | (3) | (2) |
| (B) | (4) | (3) | (2) | (1) |
| (C) | (1) | (2) | (4) | (3) |
| (D) | (1) | (2) | (3) | (4) |

27. Which of the following years was celebrated by India as the 'E-governance year ?

(A) 2001

(B) 2002

(C) 2003

(D) 2004

28. Who wrote the book entitled "Development Administration– Concept and Problems" ?

(A) Appleby

(B) L.D. White

(C) Willobi

(D) Swerdlow

27. खालीलपैकी कोणते वर्ष भारताने ई-प्रशासन वर्ष म्हणून साजरे केले ?

(A) 2001

(B) 2002

(C) 2003

(D) 2004

28. 'डेव्हलपमेंट ॲडमीनीस्ट्रेशन कन्सेप्ट ॲन्ड प्रॉब्लेम' या शीर्षकाचे पुस्तक कोणी लिहिले ?

(A) ॲपलबी

(B) एल. डी. व्हाईट

(C) विलोबी

(D) स्वेर्डलो

29. Sarkaria Commission submitted its report on ...................... date.

(A) 27th October, 1987

(B) 26th April, 1966

(C) 24th November, 1972

(D) 20th May, 1981

30. Which Article of the Indian Constitution describes India as a 'Union of States'.

(A) Article 11

(B) Article 4

(C) Article 13

(D) Article 1

29. सरकारीया आयोगाने आपला अहवाल ........................ दिवशी सादर केला.

(A) 27 आक्टोबर, 1987

(B) 26 एप्रील, 1966

(C) 24 नोव्हेंबर, 1972

(D) 20 मे, 1981

30. भारतीय राज्यघटनेचे कोणते कलम 'भारत हा राज्यांचा संघ' आहे असे वर्णन करते ?

(A) कलम 11

(B) कलम 4

(C) कलम 13

(D) कलम 1

31. Who is the Prime Minister of Myanmar ?
    (A) Owang San Su Ki
    (B) Thiyen Sen
    (C) Khin Ki
    (D) Ne Win

32. Which is the most important element of current global politics ?
    (A) Technical
    (B) Economical
    (C) Political
    (D) Military

33. According to Huntington which of the following countries can be considered as coming under the third wave of democratization ?
    (A) Japan and Germany
    (B) India and Israel
    (C) Britain, France and USA
    (D) Southern and Eastern Europe

31. मान्मारचे पंतप्रधान कोण आहेत ?
    (A) आँग सान सू की
    (B) थीयेन सेन
    (C) खिन की
    (D) ने वीन

32. सद्यकालीन जागतिक राजकारणाचा सर्वात महत्त्वाचा घटक कोणता आहे ?
    (A) तांत्रिक
    (B) आर्थिक
    (C) राजकीय
    (D) लष्करी

33. हंटींग्टन यांच्या मते खालीलपैकी कोणते देश लोकशाहीकरणाच्या तीसऱ्या लाटेत येऊ शकतात ?
    (A) जपान आणि जर्मनी
    (B) भारत आणि इस्त्रायल
    (C) ब्रिटन, फ्रान्स आणि युएसए
    (D) दक्षिण आणि पूर्व युरोप

34. Which of the following pairs are correctly matched ?

(*a*) Samuel Huntington

(*b*) Mikhail Gorbachev

(*c*) Henry Kissinger

(1) Clash of civilization

(2) Perestroika and Glasnost

(3) Detente

**Codes :**

(A) (1) and (2)

(B) (1) and (3)

(C) (2) and (3)

(D) (1), (2) and (3)

35. Who among the following is the pioneer of the theory of neo-realism ?

(A) Kenneth Waltz

(B) Hans Morgenthau

(C) Barry Buzan

(D) Raul Prebisch

34. खालीलपैकी कोणत्या जोड्या तंतोतंत जुळतात ?

(*a*) सॅम्युअल हंटींग्टन

(*b*) मिखाईल गोर्बाचेव्ह

(*c*) हेन्री किसींजर

(1) क्लॅश ऑफ सिव्हीलायझेशन

(2) पेरेस्त्रोयका आणि ग्लासनोस्त

(3) देतान्त

**संकेतांक :**

(A) (1) आणि (2)

(B) (1) आणि (3)

(C) (2) आणि (3)

(D) (1), (2) आणि (3)

35. खालीलपैकी कोण नववास्तववादी सिद्धांताचे उदगाते आहेत ?

(A) केनेथ वाल्ट

(B) हॅन्स मॉर्गेन्थॉ

(C) बॅरी बुझान

(D) रॉउल प्रिबीश

36. The speed and intensification of economic, political, social and cultural relations across international borders is known as ................ .

(A) Political economy

(B) Economic development

(C) Globalization

(D) World economy

37. The farmers organisation, Bharatiya Kissan Union was established by ............................ .

(A) Sharad Joshi

(B) Mahendra Singh Tikait

(C) Nandunjappa

(D) Raju Shetti

38. When was fundamental duties were incorporated in the Indian Constitution ?

(A) 1948

(B) 1950

(C) 1976

(D) 1971

36. आर्थिक, राजकीय, सामाजिक, व सांस्कृतिक संबंधांचे वेगाने आंतरराष्ट्रीय सीमारेषांच्या पलीकडे होणारे संचरण म्हणजे ............. .

(A) राजकीय अर्थशास्त्र

(B) आर्थिक विकास

(C) जागतिकीकरण

(D) जागतिक अर्थव्यवस्था

37. भारतीय किसान युनियन ही शेतकरी संघटना .................. नी स्थापन केली.

(A) शरद जोशी

(B) महेंद्र सींग टिकैत

(C) नंदूनज्जाप्पा

(D) राजू शेट्टी

38. भारतीय राज्यघटनेत मूलभूत कर्तव्यांचा समावेश केव्हा करण्यात आला ?

(A) 1948

(B) 1950

(C) 1976

(D) 1971

39. On whose recommendations was the Constituent Assembly formed ?

(A) Cabinet Mission Plan

(B) Mountbatten Plan

(C) Govt. of India Act, 1935

(D) Cripps Mission Plan

40. Which one of the following pairs is *not* correctly matched ?

(A) Huntington : Differentiation

(B) Gabriel Almond : Structural Differentiation

(C) Huntington : Participation

(D) Gabriel Almond : Centralization

39. घटना परिषदेची निर्मिती कोणाच्या शिफारसीने केली गेली ?

(A) कॅबीनेट मिशन योजना

(B) माउंटबॅटन योजना

(C) 1935चा भारत सरकार कायदा

(D) क्रिप्स मिशन योजना

40. खालीलपैकी कोणती जोडी योग्य जुळली **नाही** ?

(A) हंटिंग्टन — विभिन्नीकरण

(B) गॅब्रियल आमंड — रचनांचे विभिन्नीकरण

(C) हंटिंग्टन — सहभाग

(D) गॅब्रियल आमंड — केंद्रीकरण

41. Which one of the following pairs is correctly matched ?

(A) Civic culture: Parochial and political culture

(B) Civic culture: Subject and super participant culture

(C) Civic culture: Participation and political culture

(D) Civic culture: Parochial, Subject and participant culture

41. खालीलपैकी कोणती जोडी बरोबर जुळली आहे ?

(A) नागरी संस्कृती : आज्ञांकित आणि राजकीय संस्कृती

(B) नागरी संस्कृती : संकुचित आणि उच्च सहभाग संस्कृती

(C) नागरी संस्कृती : सहभाग आणि राजकीय संस्कृती

(D) नागरी संस्कृती : आज्ञांकित, संकुचित आणि सहभाग प्रधान संस्कृती

42. Which one of the following pairs is *not* correctly matched ?

(A) Vilfredo Pareto — The Mind and Society

(B) Gaetano Mosca — The Ruling Class

(C) C. Wright Mills — The Power Elite

(D) Karl Mannheim — Elite and Non-Elite

43. Which one of the following pairs is *correctly* matched ?

(A) Steven Lukes — Power : Radical View

(B) Michel Foucault — Political System

(C) Gramsci — A Theory of Justice

(D) Hannah Arendt — Political Liberalism

42. खालीलपैकी कोणती जोडी योग्यप्रकारे जुळवली **नाही** ?

(A) विल्फ्रेड परेटो — द माईंड अॅन्ड सोसायटी

(B) गटॅनो मोस्का— द रूलिंग क्लास

(C) सी. राईट मिल्स — द पावर इलिट

(D) कार्ल मॅनहिंम — इलिट अॅन्ड नॉन-इलिट

43. खालीलपैकी कोणती जोडी **योग्य** जुळली आहे ?

(A) स्टीव्हन ल्युक्स — पॉवर : रॅडिकल व्हव्यू

(B) मिचेल फोकॉल्ट — पॉलिटिकल सिस्टीम

(C) ग्राम्सी — अ थ्योरी ऑफ जस्टीज

(D) हॅना ऑरेंट — पॉलिटिकल लिबरॅलिझम

44. Which of the following statements are *correct* ?

(*a*) Between 1950 and 1967, there was congress dominant at the centre level.

(*b*) After the fourth general election of 1967, in six states coalition government was formed.

(*c*) Between 1950 and 1967, there was not congress dominant at the state level.

Select the *correct* option from the following codes :

(A) (*a*) and (*c*)

(B) (*b*) and (*c*)

(C) (*a*) and (*b*)

(D) (*a*), (*b*) and (*c*)

44. खाली दिलेली कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(*a*) 1950 ते 1967 मध्ये केंद्र पातळीवरती काँग्रेसचे प्रभुत्व होते.

(*b*) 1967 च्या चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर सहा राज्यांमध्ये आघाडीची सरकारे स्थापन झाली होती.

(*c*) 1950 ते 1967च्या दरम्यान राज्यपातळीवरती काँग्रेसचे प्रभुत्व नव्हते.

खाली दिलेल्या संकेतांकामधून **योग्य** पर्याय निवडा :

(A) (*a*) आणि (*c*)

(B) (*b*) आणि (*c*)

(C) (*a*) आणि (*b*)

(D) (*a*), (*b*) आणि (*c*)

45. Which of the following statements are *correct* ?

(*a*) The political awareness is present among the Dalits.

(*b*) There are region based political parties in India

(*c*) There are political parties that are not formed on socio-cultural basis.

Select the *correct* option from the following codes :

(A) (*a*) and (*c*)

(B) (*b*) and (*c*)

(C) (*a*), (*b*) and (*c*)

(D) (*a*) and (*b*)

45. खाली दिलेली कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(*a*) दलितांमध्ये राजकीय जागृती आहे ?

(*b*) भारतामध्ये प्रदेश हा पाया असलेले राजकीय पक्ष आहेत.

(*c*) सामाजिक-सांस्कृतिक पाया नसलेले राजकीय पक्ष आहेत.

खाली दिलेल्या संकेतांकामधून **योग्य** पर्याय निवडा :

**संकेतांक :**

(A) (*a*) आणि (*c*)

(B) (*b*) आणि (*c*)

(C) (*a*), (*b*) आणि (*c*)

(D) (*a*) आणि (*b*)

46. In which state of India the first communist government was formed?

(A) Kerala

(B) Orissa

(C) West Bengal

(D) Tamil Nadu

47. Which of the following statements are correct ?

(*a*) Gender is different from sex

(*b*) Gender is not social construction

(*c*) Gender is division of labour

Select the *correct* option from the following codes :

**Codes :**

(A) (*a*), (*b*) and (*c*)

(B) (*a*) and (*b*)

(C) (*b*) and (*c*)

(D) (*a*) and (*c*)

46. भारतातील कोणत्या घटकराज्यामध्ये प्रथम कम्युनिस्ट सरकार स्थापन झाले होते ?

(A) केरळ

(B) ओरिसा

(C) पश्चिम बंगाल

(D) तामिळनाडू

47. खाली दिलेली कोणती विधाने बरोबर आहेत ?

(*a*) लिंगभाव हा स्त्री-पुरुष भेदापेक्षा, वेगळा आहे.

(*b*) लिंगभाव ही सामाजिक संरचित नाही.

(*c*) लिंगभाव म्हणजे कामाचे विभाजन होय.

खाली दिलेल्या संकेतांकामधून **योग्य** पर्याय निवडा :

**संकेतांक :**

(A) (*a*), (*b*) आणि (*c*)

(B) (*a*) आणि (*b*)

(C) (*b*) आणि (*c*)

(D) (*a*) आणि (*c*)

48. Match List I with List II and select the *correct* answer from the codes given below :

**List I**

(*a*) Morris-Jones

(*b*) Srinivas M.N.

(*c*) Rajni Kothari

(*d*) Weiner Myron (ed.)

**List II**

(1) The Dominant Caste and Other Essays

(2) Government and Politics in India

(3) State Politics in India

(4) Politics in India

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (1) | (4) | (3) |
| (B) | (3) | (2) | (1) | (4) |
| (C) | (4) | (3) | (2) | (1) |
| (D) | (1) | (2) | (3) | (4) |

48. खालील संकेतांकाचा वापर करून यादी I व यादी II मधील योग्य जोड्या जुळवा :

**यादी I**

(*a*) मॉरिस–जोन्स

(*b*) श्रीनिवास एम.एन.

(*c*) रजनी कोठारी

(*d*) वीनर मायरॉन (संपा)

**यादी II**

(1) द डॉमिनेंट कास्ट ॲन्ड अदर एसेज्

(2) गर्व्हेमेंट ॲन्ड पॉलिटिक्स इन इंडिया

(3) स्टेट पॉलिटिक्स इन इंडिया

(4) पॉलिटिक्स इन इंडिया

**संकेताक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (1) | (4) | (3) |
| (B) | (3) | (2) | (1) | (4) |
| (C) | (4) | (3) | (2) | (1) |
| (D) | (1) | (2) | (3) | (4) |

49. Which one of the following pairs is correctly matched ? (After 1990)

(A) Tow party system — Gujarat

(B) One party system — Maharashtra

(C) One party dominance — Kerala

(D) One party system — Rajasthan

50. Which of the following is/are forms or system with which the unitary system is compatible ?

1. Presidential form of government.
2. Parliamentary form of government
3. System of judicial review

Choose the *correct* answer from the codes given below :

**Codes :**

(A) 1 and 2

(B) 1 and 3

(C) 1, 2 and 3

(D) only 3

49. खालीलपैकी कोणती जोडी बरोबर जुळली आहे ? (1990 नंतर)

(A) द्विपक्ष पद्धती — गुजरात

(B) एकपक्ष पद्धती — महाराष्ट्र

(C) प्रभुत्वशाली एकपक्ष पद्धती — केरळ

(D) एकपक्ष पद्धती — राजस्थान

50. खालीलपैकी कोणते प्रकार किंवा पद्धती एकात्म शासनपद्धतीला पूरक आहेत ?

1. अध्यक्षीय शासनपद्धती
2. संसदीय शासनपद्धती
3. न्यायालयीन पुनर्विलोकन पद्धती

खाली दिलेल्या संकेतांका मधून **योग्य** पर्याय निवडा :

**संकेतांक :**

(A) 1 आणि 2

(B) 1 आणि 3

(C) 1, 2 आणि 3

(D) केवळ 3

51. The cabinet form of government means :

(A) A system of govrnment which is marked by the existence of a group which collectively decides on the politics of the government and which is also collectively responsible to the parliament

(B) A form of government in which the cabinet is supreme and is not accountable to any other organ of the state

(C) A form of government in which all the members of the cabinet are popularly elected on the basis of universal audit franchise

(D) A form of government in which it is the President, and not the Prime Minister, who presides over the cabinet meetings for the reason that he is directly elected by the people

51. कॅबिनेट/मंत्रीमंडळात्मक शासनपद्धती म्हणजे :

(A) अशी एक शासनपद्धती की जिथे एका गटाचे अस्तित्व असते जो शासनाच्या धोरणांबाबत सामूहिकरित्या निर्णय घेतो व संसदेला संयुक्तपणे जबाबदार असतो

(B) अशी एक शासनपद्धती की जिथे कॅबिनेट सर्वश्रेष्ठ असते व ते राज्याच्या कोणत्याही शाखेला जबाबदार नसते

(C) अशी एक शासनपद्धती की जिथे कॅबिनेटचे सर्व सदस्य सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराद्वारे जनतेकडून निवडून येतात

(D) अशी एक शासनपद्धती की जिथे राष्ट्रपती नव्हे तर पंतप्रधान जनतेकडून प्रत्यक्षरित्या निवडून येतात म्हणून कॅबिनेटच्या बैठकांचे अध्यक्षपद भूषवतात

52. A rigid constitution is one which :

(A) cannot be amended

(B) can be amended only by a new constituent assembly

(C) can be amended only by two-thirds majority of the members present and voting

(D) can be amended by any procedure other than ordinary law making process prescribed by the constitution

53. Who said that "Authority is federal" ?

(A) Barker

(B) Duguit

(C) Krabbe

(D) Laski

52. परिदृढ राज्यघटना म्हणजे :

(A) जी बदलता येत नाही

(B) जी केवळ घटना परिषदेमार्फतच बदलली जाते

(C) उपस्थित राहून मतदान करणाचा सदस्यांच्या दोन तृतीयांश बहुमतानेच बदलता येते

(D) जी राज्यघटनेने घालून दिलेल्या सामान्य कायदानिर्मितीच्या प्रक्रियेशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने बदलता येते

53. अधिकार हा संघीय असतो असे खालीलपैकी कोणत्या विचारवंताने म्हटले आहे ?

(A) बार्कर

(B) ड्युईट

(C) क्राबे

(D) लास्की

54. Who among the following said that all the governments ultimately are oligarchic in nature ?

(A) F.M. Marx

(B) Vilfredo Pareto

(C) Max Weber

(D) Herbert A. Simon

55. Bureaucracy in the modern state is the form of :

(A) Traditional authority

(B) Rational legal authority

(C) Charismatic authority

(D) Political authority

56. Which of the following imposes limitations on the supremacy of the Parliament in India ?

(A) Parliamentary system

(B) Federal system and judicial review

(C) Socialistic pattern

(D) Fundamental rights

54. सर्व शासन संस्था अंतिमतः अल्पजनसत्ताच असतात' असे खालीलपैकी कोणी म्हटले आहे ?

(A) एफ.एम. मार्क्स

(B) विल्फ्रेडो परेटो

(C) मॅक्स वेबर

(D) हर्बर्ट ए. सायमन

55. आधुनिक काळातील नोकरशाही खालीलपैकी कोणत्या प्रकारची असते ?

(A) पारंपरिक अधिकार

(B) विवेकी वैधानिक अधिकार

(C) दिव्यवलयांकित अधिकार

(D) राजकीय अधिकार

56. खालीलपैकी कोणत्या घटकामुळे भारतातील संसदेच्या सर्वश्रेष्ठत्वावर मर्यादा येतात ?

(A) संसदीय पद्धती

(B) संघराज्य व्यवस्था आणि न्यायालयीन पुनर्विलोकन

(C) समाजवादी रचना

(D) मूलभूत हक्क

57. Which of the following pairs are correctly matched ?

1. Dependency theory — Samir Amin
2. Liberal theory of development — Lucian Pye
3. Theory of alienation — Karl Marx
4. Theory of negative — John Rawls

Select the *correct* answer using the codes given below :

**Codes :**

(A) 1, 2, 3 and 4

(B) 1 and 2

(C) 3 and 4

(D) 1, 2 and 3

57. खालीलपैकी कोणती जोडी योग्यरित्या जुळवली आहे ?

1. परावलंबित्वाचा सिद्धान्त — समीर अमीन
2. विकासाचा उदारमतवादी सिद्धान्त — ल्युसियन पाय
3. परात्मभावाचा सिद्धान्त — कार्ल मार्क्स
4. नकारात्मकतेचा सिद्धान्त — जॉन रॉलस

खालील संकेतांकाचा वापर करून **योग्य** उत्तर निवडा :

**संकेतांक :**

(A) 1, 2, 3 आणि 4

(B) 1 आणि 2

(C) 3 आणि 4

(D) 1, 2 आणि 3

58. Match the following :

**List I**

(*a*) Sovereign is the main source of law

(*b*) Laws are passed by legislature

(*c*) General will is sovereign

(*d*) Will, and not force, is the basis of state

**List II**

(1) Hobbes

(2) Locke

(3) Rousseau

(4) T.H. Green

Choose the *correct* answer from the codes given below :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (2) | (3) | (1) |
| (B) | (1) | (2) | (3) | (4) |
| (C) | (2) | (1) | (3) | (4) |
| (D) | (4) | (1) | (2) | (3) |

58. जोडी जुलवा :

**यादी I**

(*a*) सार्वभौम हे कायद्याचे मुख्य उगमस्थान आहे.

(*b*) कायदेमंडळ कायदे संमत करते.

(*c*) सामूहिक ईहा सार्वभौम असते.

(*d*) बळ नव्हे तर संमती हा राज्याचा आधार असतो.

**यादी II**

(1) हॉब्ज

(2) लॉक

(3) रूसो

(4) टी.एच. ग्रीन

खालील संकेतांकातून **योग्य** उत्तर निवडा :

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (4) | (2) | (3) | (1) |
| (B) | (1) | (2) | (3) | (4) |
| (C) | (2) | (1) | (3) | (4) |
| (D) | (4) | (1) | (2) | (3) |

59. Classical liberalism grew out of the struggle between :

(A) labour and bourgeoisie

(B) capitalists and feudalists

(C) middle class and the down-trodden

(D) aristocracy and commoners

60. Gandhiji believed in the principle of non-violence. Satyagraha is :

(A) a weapon to oppose violence by non-violence

(B) a method of civil disobedience

(C) a method of people's participation

(D) a weapon of violence

59. खालीलपैकी कोणत्या गटांच्या संघर्षातून अभिजात उदारमतवाद उदयास आला ?

(A) श्रमिक आणि बूर्ज्वा

(B) भांडवलदार आणि सरंजामदार

(C) मध्यम वर्ग आणि समाजाच्या तळागाळाशी असणारे

(D) महाजनशाही आणि सामान्यजन

60. महात्मा गांधींचा अहिंसेच्या तत्त्वावर विश्वास होता. हा सत्याग्रह म्हणजे ..................... .

(A) हिंसेचा अहिंसेने प्रतिकार करण्याचे साधन

(B) सविनय कायदेभंगाची पद्धती

(C) लोकसहभागाची पद्धती

(D) हिंसेचे साधन

61. According to the Fascists, the truest form of democracy is government by the :

(A) Elite

(B) War-mongers

(C) Democrate

(D) Anarchists

62. Violation of the 'Rule of Law' arises mostly from :

(A) Limited franchise

(B) Delegated legislation

(C) Lack of checks and balances

(D) Unrestrained freedom

61. फॅसिझम या विचारसरणीनुसार लोकशाहीचा खरा प्रकार म्हणजे .................... शासन.

(A) अभिजनांचे

(B) युद्धखोरांचे

(C) लोकशाही समर्थकांचे

(D) अराज्यवाद्यांचे

62. 'कायद्याचे राज्य' याचा भंग हा प्रामुख्याने खालीलपैकी कोणत्या बाबीमुळे होतो ?

(A) मर्यादित मताधिकार

(B) प्रदत्त विधान

(C) नियंत्रण आणि समतोलाचा अभाव

(D) अर्निबंध स्वातंत्र्य

63. Which of the following is *correctly* matched ?

| Theories of Nature of State | Statements Regarding Nature of State |
|---|---|
| (A) Idealist | State will wither away |
| (B) Mechanistic | State is an association of associations |
| (C) Legal | State has a fictitious personality |
| (D) Organic | State is the objectification of spirit |

64. Who of the following wrote 'The Subjection of Women' ?

(A) Jeremy Bentham

(B) Karl Marx

(C) James Mill

(D) John Stuart Mill

63. खालीलपैकी **योग्य** जोडी कशाची लागली आहे ?

| राज्याचा स्वरूपाचा सिद्धांत | राज्याच्या स्वरूपासंबंधी विधान |
|---|---|
| (A) आदर्शवादी | राज्य नाहिसे होईल |
| (B) यांत्रिकी | राज्य हे संस्थांची संस्था आहे |
| (C) वैधानिक | राज्याला बनावट व्यक्तिमत्त्व असते |
| (D) सेंद्रीय | आत्म्याचे राज्य हे वस्तूरूप आहे |

64. खालीलपैकी कोणत्या विचारवंताने 'द सब्जेक्शन ऑफ वुमेन' हा ग्रंथ लिहिला ?

(A) जेरेमी बेन्थम

(B) कार्ल मार्क्स

(C) जेम्स मिल

(D) जॉन स्टुअर्ट मिल

65. Mahatma Gandhi launched the Satyagraha movement in 1919. Which of the following was the *correct* reason ?

(*a*) It was a protest against the British government for its failure to introduce promised reforms at the end of the war.

(*b*) It was a protest against the massacre at Jallianwala Bagh, Amritsar.

(*c*) It was a protest against the Rowlatt Act.

(*d*) It was a protest against communal awards.

**Codes :**

(A) (*a*) and (*c*)

(B) Only (*c*)

(C) (*c*) and (*d*)

(D) Only (*b*)

65. 1919 मध्ये महात्मा गांधींनी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. खालीलपैकी त्याचे **योग्य** कारण कोणते होते ?

(*a*) युद्धसमाप्तीच्या वेळेस ब्रिटीश शासनाला सुधारणांसंबंधी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात आलेल्या अपयशाच्या विरोधात

(*b*) अमृतसर येथील जालियानवाला बाग हत्याकांडाच्या विरोधात.

(*c*) रौलट अधिनियमाच्या विरोधात.

(*d*) जातीय निवड्याच्या विरोधात.

**संकेतांक :**

(A) (*a*) आणि (*c*)

(B) केवळ (*c*)

(C) (*c*) आणि (*d*)

(D) केवळ (*b*)

66. Who represented the Congress in the Second Round Table Conference at London (1931) ?

(A) Mahatma Gandhi

(B) Jawahar Lal Nehru

(C) Srinivas Shastri

(D) B.R. Ambedkar

67. The Lahore Session of the Congress which adopted a resolution of complete independence for India was presided over by :

(A) Subhash Chandra Bose

(B) Mahatma Gandhi

(C) Motilal Nehru

(D) Jawaharlal Nehru

68. The basic principle of liberalism is :

(A) Individual freedom

(B) Social justice

(C) Equality

(D) Nationalism

66. लंडन येथील दुसऱ्या गोलमेज परिषदेत (1931) खालीलपैकी कोणी काँग्रेसचे प्रतिनिधित्व केले ?

(A) महात्मा गांधी

(B) जवाहरलाल नेहरू

(C) श्रीनिवास शास्त्री

(D) बी. आर. आंबेडकर

67. काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनात जो संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पारित करण्यात आला त्याची अध्यक्षता खालीलपैकी कोणी केली ?

(A) सुभाषचंद्र बोस

(B) महात्मा गांधी

(C) मोतीलाल नेहरू

(D) जवाहरलाल नेहरू

68. उदारमतवादाचे मुख्य तत्त्व काय आहे ?

(A) व्यक्तिगत स्वातंत्र्य

(B) सामाजिक न्याय

(C) समता

(D) राष्ट्रवाद

69. Marxism is considered as a Utopia but sabine finds this utopia ............ .

    (A) Generous and a humane one
    (B) Anti-capitalist and prodemocracy
    (C) Restrictive and class oriented
    (D) Anti-imperialist and pro-authoritarian

70. Which of the following pairs is *correctly* matched ?

    (A) Rousseau — Civil society
    (B) Locke — Original position
    (C) Plato — Veil of ignorance
    (D) Machiavelli — Hegemony

69. मार्क्सवादाला स्वप्नदर्शी मानले जाते. परन्तु सबाईन या विचारवंताच्या मते हा स्वप्नदर्शीविचार खालीलपैकी कोणत्या वैशिष्ट्याचा आहे ?

    (A) औदार्यपूर्ण आणि मानवतावादी
    (B) भांडवलशाही विरोधी आणि लोकशाहीस अनुकूल
    (C) प्रतिबंधात्मक आणि वर्गाभिमुख
    (D) साम्राज्यवाद विरोधी आणि अधिकारशाहीस अनुकूल

70. खाली दिलेल्या जोड्यांतील कोणती **योग्य** जोडी जुळली आहे ?

    (A) रूसो – नागरी समाज
    (B) लॉक – मूळ स्थिती
    (C) प्लेटो – अज्ञानाचा पडदा
    (D) मॅकिआव्हेली – वर्चस्व

71. Select the *correct* answer by using the codes given below :

**Assertion (A) :** Hobbes said "Man is solitary poor, nasty, brutish and short".

**Reason (R) :** There can be no morality, justice, industry and civilisation.

**Codes :**

(A) (A) is correct but (R) is incorrect

(B) Both (A) and (R) are correct and (R) is reason of (A)

(C) (A) is incorrect but (R) is correct

(D) Both (A) and (R) are correct but (R) is not the correct reason of (A)

71. खालील संकेतसूचीचा वापर करून योग्य उत्तर निवडा :

**विधान (A) :** हॉब्जच्या मते, माणूस हा एकांकी, गरीब, ओंगळ, क्रूर आणि खुजा असतो.

**कारण (R) :** त्यांच्याकडे नैतिकता, न्याय, उद्योगशीलता सुसंस्कृती नाही.

**संकेतांक :**

(A) (A) बरोबर आहे, परंतु (R) चूक आहे

(B) दोन्ही (A) आणि (R) बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे कारण आहे

(C) (A) चूक आहे, परंतु (R) बरोबर आहे

(D) दोन्ही (A) आणि (R) बरोबर आहेत, परंतु (R) हे (A) चे कारण नाही

72. Who said "Inequality is the constraint in the realization of liberty" ?

(A) Rousseau

(B) Thomas Hobbes

(C) J.S. Mill

(D) T.H. Green

73. Which among the following is an *incorrect* statement ?

(A) Negative liberty is the absence of obstacles

(B) Classical liberal state makes a claim for private property

(C) Modern liberal state advocates Laissez-faire economy

(D) Maximum government is main feature of welfare state

74. Which one of the following pairs is *correctly* matched ?

(A) Classical political theory — Value oriented

(B) Empirical political theory — Value oriented

(C) Empirical political theory — Anti-positivism

(D) Classical political theory — Anti-historicism

72. 'विषमता हा स्वातंत्र्य प्राप्तीमधील अडथळा आहे' असे कोणी म्हटले आहे ?

(A) रूसो

(B) थॉमस हॉब्ज

(C) जे.एस. मिल

(D) टी.एच. ग्रीन

73. खालीलपैकी **अयोग्य** विधान ओळखा :

(A) अडथळ्याचा अभाव म्हणजे नकारात्मक स्वातंत्र्य आहे

(B) खाजगी संपत्तीचा दावा अभिजात, उदारमतवादी राज्य करते

(C) आधुनिक उदारमतवादी राज्य मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करते

(D) जास्तीत जास्त शासन हे कल्याणकारी राज्याचे मुख्य वैशिष्ट्ये आहे

74. खालीलपैकी कोणती जोडी **बरोबर** जुळली आहे ?

(A) अभिजात राजकीय सिद्धांत — मूल्यात्मक

(B) अनुभववादी राजकीय सिद्धांत — मूल्यात्मक

(C) अनुभववादी राजकीय सिद्धांत — प्रत्यक्षार्थवाद विरोधी

(D) अभिजात राजकीय सिद्धांत — इतिहासवाद विरोधी

75. Which one of the following pairs is *not* correctly matched ?

(A) John Rawls theory of justice — Each person is to have an equal right to the most extensive liberty compatible with similar liberty to others

(B) Feminist Account of Justice — The greatest benefit of the least advantaged

(C) John Rawls theory of justice — Attached to offices and positions open to all under conditions of fair equality and opportunity

(D) Amartya Sen Approach — Justice as a capability based.

75. खालीलपैकी कोणती जोडी बरोबर जुळली **नाही** ?

(A) जॉन रॉल्सचा न्याय सिद्धांत – प्रत्येक व्यक्तीला समान हक्क असतील, तसेच इतरांच्या बरोबरीने पूर्ण स्वातंत्र्र असेल

(B) स्त्री वाद्यांची न्याय संकल्पना – सर्वाधिक दुर्बळ घटकाला जास्तीत जास्त लाभ मिळावा

(C) जॉन रॉल्सचा न्याय सिद्धांत – सर्व पदे सर्वासाठी खुली असावीत तसेच त्यांना प्राप्त करण्यासाठी सर्वांना 'समान संधी' प्राप्त असावी

(D) अमर्त्य सेनचा दृष्टिकोन – कार्यक्षमता आधारित न्याय

ROUGH WORK